# माध्यमिक शिक्षकांच्या लहान कुटुंब आणि लोकसंख्या शिक्षण याविषयीच्या अभिवृत्तीचा अभ्यास

*श्रीमती माधुरी एम. जावळे

आजच्या आधुनिक काळात मानवाने विविध क्षेत्रांमध्ये आपल्या बुध्दीच्या जोरावर मोठया प्रमाणावर यश संपादन केलेले आहे त्यामुळे मानवाचे जीवन हे सुखी व समृध्द झालेले आहे. तरीसुध्दा आज मानवासमोर अनेक समस्या उभ्या राहत आहेत यात प्रामुख्याने पर्यावरणीय समस्या, जागतिक मंदी, प्रदुषण, पाणी टंचाई, बेकारी, भ्रष्टाचार वाध्ती लोकसंख्या इत्यादींचा समावेश होतो. लोकसंख्या वाढीचा प्रश्न वा समस्या ही प्रामुख्याने विसनशिल देशांमध्ये आढळून येते. भारताला आज स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे झाली तरी दारिद्रय, बेकारी, गरीबी यासरख्या समस्यांचे देशातून उच्चाटन झालेले नाही. भारताच्या लोकसंख्यावाढीस सर्वसाधारणपणे 18 व्या शतकापासून सुरवात झालेली दिसून येते मात्र लोकसंख्यावाधिढया वेगाचे तीव्र स्वरुप 20 व्या शतकाच्या सुरवातीपासून दिसून येते.

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या उत्तरार्धापासूनच कुटुंब नियोजन कार्यक्रम हाती घेतला मात्र या कार्यक्रमास समाजाकडून पाहिजे तितका उत्स्फुर्त प्रतिसाद मिळालेला नाही व अजूनही मिळत नाही ही वस्तूस्थिती आहे. भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे भारतात अनेक जाती- धर्माचे लोक राहातात. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा इत्यादींनी ग्रासलेल्या व बहुविध जातीधर्माच्या या देशात कुटुंब नियोजनाची कल्पना रुजविणे अत्यंत कठीण कार्य आहे.

देशासमोर मुख्यत्वेकरुन ज्या समस्या निर्माण होतात त्या समस्यांच्या मुळाशी असणा-या अनेक कारणांपैकी लोकसंख्यावाढ हे एक कारण आहे. लोकसंख्या वाढीच्या भस्मासूरामुळे स्वातंत्र्योत्तर काळात प्रत्येक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती करुनही सर्वसामान्य माणसाच्या वाटयाला त्या प्रगतीची फळे योग्य प्रमाणात येवू शकलेली नाहीत हे एक कटू सत्य आहे.

**संशोधनाचा हेतू व महत्व-** वाढत्या लोकसंख्येला आळा न घातल्यास मानवी जीवनाचा अंत दूर नाही. वाढती लोकसंख्या ही देशाच्या अर्थिक, औद्योगिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक इत्यादी सर्व प्रकारच्या विकासास बाधक ठरते. लोकसंख्येच्या भस्मासूराला वेळीच आळा घातला नाही तर देशाचा विकास खुंटुन देशापुढील समस्यांमध्ये अधिकच वाढ होणार आहे. मुलभूत गरजांची पूर्तता न होणे, आरोग्याच्या सुविधा कमी पडणे, शिक्षणाच्या प्रसारात अडथळे येणे, बेकारी, दारिद्रय इत्यादी समस्यांमुळे नागरिकांचे एकूण जीवनमान घसरले आहे. या सर्व समस्यांचा एकच उपाय आहे तो म्हणजे लोकसंख्या वाढ रोखणे होय.

1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात दहा गाभाघटकांचा समावेश करण्याात आलेला आहे त्या दहा गाभाघटकांपैकी सहा गाभघटक हे लोकसंख्या शिक्षणाशी प्रामुख्याने प्रत्यक्षपणे संबंधित आहेत. ते गाभाघटक म्हणजे -

1.छोटया कुटुंबाच्या प्रमाणकाचे पालन
2. स्त्री- पुरुष समानता
3. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास
4. पर्यावरणाचे संरक्षण
5. सामाजिक अडसरांचे निर्मुलन
6. संविधानात्मक जबाबदा-या

लोकसंख्या शिक्षणाच्या बाबतीत अनेक गैरसमज आहेत ‘लोकसंख्याशिक्षण म्हणजे लोकसंख्या कमी करण्याचे शिक्षण’, ‘लोकसंख्याशिक्षण म्हणजे कुटुंबनियोजन’, ‘लोकसंख्याशिक्षण म्हणजे लोकसंख्येची सांख्यिकीय माहिती देण ’ पण लोकसंख्याशिक्षण म्हणजे छोटया कुटुंबाचा आदर्श, प्रलंबित विवाह, पर्यावरणाचे संरक्षण, वैज्ञानिक मनोभावाचा परिपोष, काटकसर, लसीकरण, उत्तम जीवनमानाकडे वाटचाल इत्यादी लोकसंख्याशिक्षण विषयक तत्वे उद्याच्या भावी पिढीच्या अंगी बाणावीत, ती अंगीकारावीत व समाजाशी आपली बांधिलकी सिध्द करावीत हे लोकसंख्या शिक्षणाला अभिप्रेत आहे.

शिक्षकाची भूमिका समाजात फार महत्वाची आहे.शिक्षक हा भावी पिढीचा शिल्पकार असतो.तो उदयाच्या सुजाण नागरिकास आकार देत असतो.भावी पिढी आणि लवकरच प्रजोत्पादन कालखंडात प्रवेशणारी मुले-मुली यांना लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची जाणीव शिक्षकांनी करुन दिल्यास कदाचीत या समस्येची तीव्रता भविष्यात कमी होण्यास मदत होईल.पर्यावरण व लोकसंख्या या दोन घटकांचा जवळचा संबंध आहे.म्हणून शालेय अभ्यासक्रमातही लोकसंख्याविषयक विविध मुदयांचा समावेश करण्यात आलेला आहे.संशोधिकेने प्रस्तुत संशोधन हे भावी पिढीचे शिल्पकार माध्यमिक शिक्षक यांची अभिरुची पडताळण्याच्या दृष्टिने केलेले आहे.

**समस्या विधान -**माध्यमिक शिक्षकांच्या लहान कुटुंब आणि लोकसंख्या शिक्षण याविषयीच्या अभिवृत्ती चा अभ्यास करणे.

**समस्या विधानातील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या -**

➢**माध्यमिक शिक्षक-**ज्यांनी पदवी (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.) व शिक्षणशास्त्र विषयातील पदवी (बी.एड.) संपादन केलेली आहे व सध्या शाळेत अध्यापनाचे कार्य करीत आहेत अशा व्यक्ती.

➢**लहान कुटुंब-**ज्या कुटुंबात आई वडील व दोन मुल (दोन्ही मुलगे/दोन्ही मुली/एक मुलगा व एक मुलगी) आहेत असे कुटुंब किंवा ज्या कुटुंबात आई वडील व एकच मुलगा/ उकच मुलगी आहेत असे कुटुंब.

* अध्यापक विद्यालय, फैजपूर, जळगाव

**माध्यमिक शिक्षकांच्या अभिवृत्तीचे मध्यमान प्रमाण विचलन व सार्थकता स्तर दर्शविणारी सारणी -**

| | माध्यमिक स्त्री शिक्षिकाN =25 | | माध्यमिक पुरुष शिक्षकN = 25 | | प्राप्त t मूल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| | मध्यमान | प्रमाण विचलन | मध्यमान | प्रमाण विचलन | | |
| लहान कुटुंब | 9.32 | 12.48 | 9.68 | 3.50 | 0.38 | असार्थक |
| लोकसंख्या शिक्षण | 3.15 | 2.73 | 12.35 | 2.14 | 0.23 | असार्थक |

प्राप्त t चे मूल्य हे नमूना t च्या मूल्यापेक्षा कमी असल्यामुळे मुख्य परिकल्पनेचा त्याग करुन शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

➢अभिवृत्ती- लहान कुटुंब व लोकसंख्या शिक्षण याबाबत माध्यमिक शिक्षकांच्या मनाचा कल.

**संशोधनाची उद्दिष्टये-** 1.माध्यमिक पुरुष शिक्षकांच्या लहान कुटुंब व लोकसंख्या शिक्षण याविषयीच्या अभिवृत्तीचा शोध घेणे. 2.माध्यमिक स्त्री शिक्षकांच्या लहान कुटुंब व लोकसंख्या शिक्षण याविषयीच्या अभिवृत्तीचा शोध घेणे. 3. माध्यमिक पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षक यांच्या लहान कुटुंब व लोकसंख्या शिक्षण याविषयीच्या अभिवृत्तीचा शोध घेणे.

**संशोधनाची परिकल्पना -** माध्यमिक स्त्री शिक्षक व माध्यमिक पुरुष शिक्षक यांच्या लहान कुटुंब आणि लोकसंख्या शिक्षण या विषयांच्या अभिवृत्तीत सार्थ फरक नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -** प्रस्तुत संशोधने सावदा व फैजपूर या दोन शहरातील नगरपालिकांच्या मुले व मुलींच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांपुरतेच मर्यादित आहेत.

**संशोधनाची साधने-**प्रस्तुत संशोधन विषयक माहिती ही डॉ.टी.एस.सोधी व डॉ.जी.डी.शर्मा प्रमाणित लहान कुटुंब आणि लोकसंख्या शिक्षण विषयक अभिवृत्ती मापिकेचा उपयोग करुन संकलित केलेली आहे.

**न्यादर्श-** प्रस्तुत संशोधनासाठी 25 पुरुष शिक्षक व 25 स्त्री शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन पध्दती -** प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळाशी निगडीत असल्यामुळे संशोधिकेने सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग संशोधनासाठी केलेला आहे.

माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ - लहान कुटुंब आणि लोकसंख्या शिक्षण विषयक अभिवृत्ती मापिकेच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण केले आणि या माहितचा अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, t मूल्य या सांख्यिकी तंत्राचा उपयोग केला त्यावरुन माध्यमिक स्त्री शिक्षिका व माध्यमिक पुरुष शिक्षक यांच्या लहान कुटुंब आणि लोकसंख्या शिक्षण या विषयीच्या अभिवृत्तीचे निष्कर्ष मांडला.

**निष्कर्ष-** माध्यमिक स्त्री शिक्षक व माध्यमिक पुरुष शिक्षक यांच्या लहान कुटुंब आणि लोकसंख्या शिक्षण या विषयांच्या अभिवृत्तीत सार्थ फरक नाही.

## संदर्भ ग्रंथ

1. रा.श मुळे , वि.तु.उमाठे, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे. 2. ना.के. उपासनी, के.वि. कुलकर्णी नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र श्री विद्या प्रकाशन, पुणे. 3. प्रभाकर हकीम, लोकसंख्या शिक्षण नित्य नूतन प्रकाशन, पुणे. 4. बा.गं. अहिरे, कै.मु. बोंदार्डे, लोकसंख्या शिक्षण नूतन प्रकाशन, पुणे.